उंट: वाळवंटातील जहाज



जॉन एफ वाटर्स

चित्र: रेनॉल्ड रफिफन्स


उंट हा एक माणसाच्या कामी येणारा प्राणी. त्याच्या डोळ्याच्या पापण्यासुद्धा कामं करतात. आठवडाभर वाळवंटात प्रवास केला तरी उंटाला तहान लागत नाही. नंतर जेव्हा पाणी मिळेल तेव्हा एका दमात शंभर लिटर पाणी उंट पिऊ शकेल. खायला काहीही नसले तरी तिच्या कुबडामध्ये साठलेली चरबी खाऊन ते जिवंत राहील. यामुळेच वाळवंटात आयुष्य काढणाऱ्यांना उंट हा एक अमूल्य ठेवा आहे असे वाटत असेल.

जॉन वाटर्स यांनी उंट अशा कठिण परिस्थितीत कसे जगतात याचे वर्णन केले आहे. उंटांना वा वाळवंटाला कधीही न पाहिलेल्या मुलांना या प्राण्याची परिस्थितीबरोबरच्या लढ्याची गोष्ट आश्चर्यचकित करेल.

उंट: वाळवंटातील जहाज

जॉन एफ वाटर्स
चित्र: रेनॉल्ड रफिफन्स

मराठीत प्रभाकर नानावटी




उंटः वाळवंटातील जहाज

जॉन एफ वाटर्स

चित्रः रेनॉल्ड रफिफन्स







उंट कोरड्या व गरम हवेत जिवंत राहू शकतात. ते वाळवंटात आयुष्य काढतात. माणसं उंटावर बसून वाळवंट पार करतात. उंट ओझेही घेऊन जाते. कार्पेट, नारळ, मीठ, धान्य, पाम तेल, खजूर इत्यादींची एका ठिकाणापासून दुसऱ्या ठिकाणी ते ने-आण करू शकते. त्यामुळेच उंटाला वाळवंटातील जहाज असे म्हणतात.




तुम्ही कधी वाळवंटात चाललात का?चालताना तुमचे पाय वाळूत रुतून बसतात. उंट मात्र अशा वाळूत सहजपणे चालू शकतात. त्यांच्याकडे रुंद, मऊ, पॅड केल्यासारखे पाय आहेत. त्यांना वाळूमध्ये बुडण्यापासून किंवा खडकावर घसरण्यापासून रोखतात.






वाळू किंवा धूळ याचे कण उडत येऊन तुमच्या डोळ्यात कधी तरी गेला आहे का? उंटाच्या जोळ्याच्या पापण्या लांब व वजनदार असतात. त्यामुळे वाळू वा कचरा त्यांच्या डोळ्यात शिरू शकत नाहीत. वाळू वा कचऱ्याचे कण तुमच्या तोंडात वा नाकात कधी गेलेत का? उंट स्वतःचे नाकपुड्या बंद करू शकते. त्यामुळे कण त्यांच्या नाकात जाऊ शकत नाहीत.









तुम्ही काही तास पाणी न पिल्यास तुम्हाला तहान लागते. उंटांना तितक्या लवकर तहान लागत नाही. उन्हाळ्यात हवा गरम असताना आठ- दहा दिवस उंट पाण्याशिवाय राहू शकतात. थंडीच्या दिवसातसुद्धा आठ-दहा आठवडे पाणी नसले तरी त्यांना चालते. रसरशीत पाला पाचोळा खाऊन आपली पाण्याची तहान भागवतात.






कडक उन्हाळ्याच्या दिवसात माणूस पाण्याविना जास्तीत जास्त तीन दिवस काढू शकतो. कडक उन्हाळ्यात वाळवंटातील खडकांचे तापमान ६५डिग्री सेल्सिअस जाऊ शकेल. या तापमानात उंटसुद्धा मरू शकतात. माणसंही मरू शकतात. परंतु कडक उन्हाळ्यात उंट आपले शरीर थंड ठेवण्याचा प्रयत्न करेल.








उंटांना घाम येते. शरीराची उष्णता कमी करण्याचा तो एक उपाय आहे. घाम आल्यास आपल्या शरीराचे तापमान ३७ डिग्री सेल्सिअस (९८.६ डिग्री फॅरनहीट) राहू शकेल. जास्त घाम आल्यास शरीरातून जास्त प्रमाणात पाणी बाहेर पडेल. त्यामुळे जास्त ऊन असल्यास आपण जास्त पाणी पितो.








वाळवंटात सकाळच्या वेळचे उंटाच्या शरीराचे तापमान ३४ डिग्री सेल्सिअसपर्यंत खाली जाते. दिवस जसजसा पुढे पुढे जातो तेव्हा तापमान वाढते. दुपारी ते ४० डिग्री असू शकते. तेव्हा उंटाला घाम येऊ लागतो. रात्रीचे तापमान ३३ डिग्रीपर्यंत खाली जाते.








फार ऊन असताना आपल्याला पटकन गरम वाटू लागते. आपल्याला घाम येऊ लागतो. घाम येत असताना रक्ताचा तापमान कमी होतो. रक्ताची उष्णता त्वचेला पोचते. ही एक शारीरिक उष्णता कमी करण्याच पद्धत आहे. आपल्याला घाम येत असताना रक्त जास्त घट्ट होते. त्यामुळे रक्त नीटपणे त्वचेपर्यंत पोचत नाही. त्यामुळे शारीरिक तापमान कमी होत नाही. हे तापमान वाढतच गेल्यास जिवास धोका होऊ शकतो.







उंटाच्या बाबतीत मात्र रक्तात काही बदल होत नाहीत. रक्तातील पाण्याचा अंश कमी होत नाही. फार फार तर शरीराच्या इतर अवयवातील पाणी कमी होत राहील. उंटाचे रक्त पातळच राहील. रक्त त्वचेपर्यंत पोचत असल्यामुळे जास्त घाम येऊ लागतो. त्यामुळे उंटाच्या जिवाला धोका नसतो.




आतापर्यंत लोकांचा गैरसमज होता की उंटाला दोन पोटं असतात व त्यातील एका पोटामध्ये उंट पाणी साठवतो. काहींच्यात उंट आपल्या कुबडामध्ये पाणी साठवतो, असाही समज आहे.






अरेबियन उंटाना एकच कुबड असते.



एशियन उंटांना दोन कुबड असतात. कुठलाही उंट कुबडामध्ये पाणी साठवू शकत नाही. एक मात्र खरे की आपण जसे पिलेले पाणी खर्ची घालतो, तितक्या वेगाने उंट पाणी खर्ची घालत नाही.



उंटाच्या शरीरावरील दाट केस त्याचे शरीर थंड ठेवण्यास मदत करतात. त्याच्या शरीरावर कित्येक इंच जाडीचा केसाचा थर आहे. त्यामुळे गरम सूर्य किरण त्याच्या त्वचेपर्यंत पोचू शकत नाहीत. उंटाच्या शरीरावरील केस एखाद्या पांघरुणासारखे आतील ऊब बाहेर जाऊ देत नाहीत. आपणही पांधरूण त्यासाठीच घेत असतो. उंटाच्या शरीरावरील केस पांघरुणाप्रमाणे उष्णता बाहेरच राहू देते.










बहुतेक प्राण्यांच्या त्वचेखाली चरबी असते. आपल्या त्वचेच्या आतही चरबी असते. चरबी इन्सुलेटरप्रमाणे काम करते. उष्णता पकडून ठेवून प्राण्यांना उबदार ठेवते. उंटाच्या त्वचेच्या आत चरबी नसते. त्यामुळे त्वचेतून उष्णता बाहेर सोडू शकते.


PS140
PS140


HUMAN SKIN
sweat pore
fat cells
sweat gland


सर्व प्राण्यांना जिवंत राहण्यासाठी चरबीची गरज असते. उंटाची चरबी त्याच्या कुबडामध्ये असते. दोन कुबड असल्यास दोन्हीतही चरबी असते. योग्य वेळी योग्य प्रमाणात आहार न मिळाल्यास उंट कुबड्यातील चरबी वापरून आहार तयार करू शकते.









प्राण्याच्या शरीरातील पाणी चयापचय क्रियेतून निर्माण झालेल्या द्रवकचरा बाहेर टाकते. आपणही तेच करतो. मूत्रविसर्जन करत आसताना मूत्राद्वारे तो कचरा बाहेर फेकला जातो. उंटाच्या बाबतीतही तेच खरे आहे. फक्त उंट आपल्याप्रमाणे दिवसातून चार-पाच वेळा मूत्रविसर्जन करत नाहीत. उंट एकदाच करते व तेही अगदी थोडे. त्यामुळे उंटाच्या बाबतीत पाण्याची बचत होते.



सात – आठ दिवस वाळवंटात सतत प्रवास केल्यावर उंटसुद्धा तहानलेले असतात. काही वेळा पाणी नसल्यामुळे ते बारीक व हडकुळे वाटतात. त्यांचे पोट आत गेलेले असते. तेव्हा त्याना भरपूर पाण्याची गरज असते. पाठीवरील ओझे उतरवल्यानंतर ते पाणी पिण्यासाठी वाकतात. दहा दहा मिनिटं ते पाणी पीतात. एका वेळी १०० लिटर पाणी ते सहज पिऊ शकतात.







भरपूर पाणी व थोडीशी विश्रांतीनंतर पुन्हा एकदा मीठ, धान्य, चटई इत्यादींचे ओझे पाठीवर घेण्यासाठी तयार होतात. वाळवंटातील हे जहाज कडक उन्हात, निर्जल वाळवंटातील अजून एका प्रवासासाठी सिद्ध होतात.

